**सुमित्रा आत्माराम जाधव वि.**

**पांडूरंग बुधाजी जाधव**

**निशाणी क्रमांक २६ वरील आदेश**

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे अर्जदार यांनी मयत वादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब माफ होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. अर्जदारच्या मते, सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील वादी क्र.१ दिनांक ११/१२/२०२१ रोजी मयत झाली आहे. त्यांचे वारस अभिलेखावर दाखल करणे आवश्यक होते. परंतु अर्जदार यांना वारसांची नोंद करणेबाबत माहिती नसल्याने त्यांना वादी क्र. १ हीचे वारस मुदतीत दाखल करता आले नाहीत. त्यामुळे अर्जदार यांनी मयत वादी क्र.१ हीचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जात नमुद कारण योग्य नसल्याने अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे.

४. अर्जदार व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द कायमची ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदारने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी मयत वादी क्र.१ सुमित्रा आत्माराम जाधव हीचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. मयत वादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब रक्कम रूपये २००/- (रु.दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन माफ करणेत येतो.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक- २०/०२/२०२४

ठिकाण- सावंतवाडी

(श्रीमती आर. जी. कुंभार)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.

**Certificate**

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | U. B. Hundekar (Grade-3) |
| Court | :- | Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Sawantwadi |
| Date | :- | 20/02/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 22/02/2024 |
| Judgment/Order uploaded on | :- | 22/02/2024 |